नवीन राष्ट्रीय बायोगॅस व सेंद्रीय खत कार्यक्रमांतर्गत सन २०२२-२०२३ साठीचे अनुदान वितरीत करण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**

**ग्राम विकास विभाग**

**शासन निर्णय क्रमांकः बीजीएस २०२२/प्र.क्र.५३/योजना-५**

बांधकाम भवन इमारत, २५, मर्झबान पथ,

फोर्ट, मुंबई- ४०० ००१

दिनांक: २ मार्च, २०२६

**वाचा-**

१) केंद्र शासनाचे पत्र क्र. ३००/२/२०२०-Waste to Energy, दिनांक ०२ नोव्हेंबर, २०२२.

२) केंद्र शासनाचे पत्र क्र. १२६/१/२०२३- BIOGAS, दिनांक १० मे, २०२३.

३) ग्राम विकास विभाग शासन निर्णय क्र.बीजीएस-२०१८/प्र.क्र.९०/योजना-१, दिनांक १२ जुलै, २०१९.

४) ग्राम विकास विभाग शासन निर्णय क्र.बीजीएस-२०२२/प्र.क्र.५३/योजना-५, दिनांक १४ ऑगस्ट, २०२४.

५) ग्राम विकास विभाग शासन निर्णय क्र.बीजीएस-२०२२/प्र.क्र.५३/योजना-५, दिनांक २८ नोव्हेंबर, २०२४.

६) ग्राम विकास विभाग शासन निर्णय क्र.बीजीएस-२०२२/प्र.क्र.५३/योजना-५, दिनांक २५ मार्च, २०२५.

७) केंद्र शासनाचे पत्र क्र. २५३/९/२०२४-BIOGAS (GEN), दिनांक ३१ डिसेंबर, २०२५

८) केंद्र शासनाचे पत्र क्र. २५३/९/२०२४-BIOGAS (SC), दिनांक ३१ डिसेंबर, २०२५.

**प्रस्तावना :**

सन २०२२-२३ करीता केंद्र शासनाकडून राज्यस्तरावर PFMS प्रणालीवर उपलब्ध करुन देण्यात आलेली रक्कम संदर्भीय शासन निर्णय क्र. ४ अन्वये रु.७,६७,६३,७००/-, संदर्भीय शासन निर्णय क्र.५ अन्वये रु.४२,८२,५००/- व संदर्भीय शासन निर्णय क्र.६ अन्वये रु.३०,१२,०००/- असा एकूण रु.८,४०,५८,२००/- इतका निधी बायोगॅस संयंत्र लाभार्थांनुसार जिल्हा निहाय वितरीत करण्यात आलेला आहे.

२. सन २०२२-२३ करीता सदर वितरीत करण्यात आलेल्या रक्कमेपैकी PPA Failure मुळे रु. ३६,८३,६५०/-इतकी अखर्चित राहिलेली रक्कम मार्च, २०२५ अखेर केंद्र शासनाकडे समर्पित (Surrender) झाली. PPA Failure मुळे ज्या बायोगॅस संयंत्र लाभधारकांना व जिल्हयांना अनुदान प्राप्त झाले नाही, त्या बायोगॅस संयंत्र लाभधारकांना व जिल्हयांना राज्यस्तरावरुन PFMS प्रणालीमधून सदर रक्कमेच्या अनुदानाचा थेट लाभ हस्तांतरणाद्वारे (DBT) वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णयः-**

नवीन राष्ट्रीय बायोगॅस व सेंद्रीय खत व्यवस्थापन कार्यक्रमासाठी सन २०२२-२३ या आर्थिक वर्षाकरीता राज्यस्तरावरील PFMS प्रणालीसाठी नोंदणी करण्यात आलेल्या आयसीआयसीआय बँकेच्या बचत खाते क्रमांक १८८९०१०००९६७ वर केंद्र शासनाच्या उक्त संदर्भ क्र. ७ व ८ आदेशान्वये एकूण रु.८४,७९,८३२/- (रू.चौऱ्याऐंशी लाख एकोणऐंशी हजार आठशे बत्तीस फक्त) इतका निधी PFMS प्रणालीवर (Public Finance Management System) Drawing Limit) ने उपलब्ध करून दिलेला आहे.

२. सदर निधीपैकी, या बचत खात्याचे "आहरण व संवितरण अधिकारी" म्हणून घोषित केलेले मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद, ठाणे यांनी PPA Failure मुळे व्यपगत झालेली रु.३६,८३,६५०/-(रुपये छत्तीस लाख त्र्याऐंशी हजार सहाशे पन्नास फक्त) इतकी रक्कम PFMS प्रणालीद्वारे बायोगॅस संयंत्र लाभार्थांनुसार जिल्हांनिहाय वितरीत करावी. संबंधित लाभार्थ्यांच्या बँक खात्यामध्ये PFMS प्रणालीद्वारे अनुदानाचा थेट लाभ हस्तांतरणाद्वारे (DBT) वितरीत करावा.

३. नवीन राष्ट्रीय बायोगॅस व सेंद्रीय खत कार्यक्रम (NNBOMP) ही १००% केंद्र पुरस्कृत योजना असून, २० कलमी कार्यक्रमांच्या अंमलबजावणीचा घटक असल्याने या योजनेंतर्गत “आहरण व संवितरण अधिकारी” म्हणून घोषित करण्यात आलेले मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद ठाणे यांनी सदर आदेशानुसार या कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी तातडीने लाभार्थ्यांना अनुदान PFMS प्रणालीद्वारे वितरीत करावे. वितरीत केलेल्या अनुदान खर्चाच्या लेख्यांचे लेखापरिक्षण करून घेण्याची जबाबदारी त्या त्या जिल्हा परिषदांची राहिल.

४. या शासन निर्णयानुसार, वितरीत करण्यात येणारे अनुदान हे केंद्र शासनाच्या नवीन व नवीकरणीय ऊर्जा मंत्रालयाकडील पत्र क्र. ३००/२/२०२०-Waste to Energy, दि. ०२.११.२०२२ व दि. १०.०५.२०२३ रोजीच्या मार्गदर्शक सूचनांमध्ये नमूद करण्यात आलेल्या अटीं व शर्तीच्या अधीन राहून निधीचा विनियोग करण्यात यावा.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०३०२१०४५२७७६२० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

SANGEETA GOVIND LANDE

Digitally signed by SANGEETA GOVIND LANDE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Rural Development Department, 2.5.4.20=73D2CD74E0A5B700A8275FCC38C24A2CEAD4FF61075555472916234D2388715F, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=551A2C65FB84CF7CD639C3A2366F1CDC5A13691B2367C2D01195826E7A94A449, cn=SANGEETA GOVIND LANDE
Date: 2026.03.02 11:43:42 +05'30'

**(संगिता गो. लांडे)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रत,

१. विभागीय आयुक्त (सर्व)
२. महालेखापाल महाराष्ट्र-१ मुंबई (लेखा परिक्षा)/ (लेखा व अनुज्ञेयता)
३. महालेखापाल महाराष्ट्र-२ नागपूर (लेखा परिक्षा)/(लेखा व अनुज्ञेयता)
४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
५. मुख्य लेखा व वित्त अधिकारी , जिल्हा परिषद (सर्व)
६. मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा, कोकण भवन, नवी मुंबई
७. कृषि विकास अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
८. उप मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा (सर्व)
९. जिल्हा लेखा परिक्षक स्थानिक निधी लेखा (सर्व)
१०. संचालक, लेखा कोषागारे, महाराष्ट्र, मुंबई.
११. जिल्हा कोषगार अधिकारी (सर्व)
१२. नियोजन विभाग, कार्यासन १४४३/१४४४, मंत्रालय, मुंबई
१३. वित्त विभाग, मंत्रालय (व्यय-१५ /अर्थ-१७), मंत्रालय, मुंबई.
१४. व्यवस्थापक, आयसीआयसीआय बँक, गोखले रोड, नौपाडा, जि. ठाणे ४०० ६०१.
१५. कार्यासन क्रमांक वित्त-१, वित्त-२, वित्त-७, वित्त-८, योजना-२, ग्राम विकास विभाग.